# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 10/11/2022 (गुरूवार) सायंकाळ

---

### गैरकायदयाची मंडळी करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. उमरेड**:— अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील बेसुर येथे दिनांक ०१/११/२०२२ चे १९.३० वा. ते २०.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— माणिक भगवान देवगडे, वय ५९ वर्ष, रा. बेसुर, ता भिवापुर हा मागील ०४ वर्षापासुन सुभाष भोयर यांचेकडे किरायाने राहतात व बेसुर गावाचे आडे पटवारी यांचे सोबत काम करतात. अंदाजे ०२ वर्षापुर्वी पासुन फिर्यादीला सोहन देवगडे याने ‘‘तु माझ्या मुंलाला करणी केली आहे’’ असे म्हटल्यावरून तेव्हा पासुन आमचे एकमेकांसोबत बोलचाल बंद आहे. दिनांक ०१/११/२०२२ रोजी रात्री ०८/०० वा. फिर्यादी हे पिरावा रोडवरील नवीन घरी आराम करीत असतांना फिर्यादीचे घरासमोरून बोलण्याचा आवाज आल्याने फिर्यादीने घरातून बाहेर येवुन पाहीले असता, त्याला घरासमोर सोहन देवगडे व त्याची पत्नी सौ. लता देवगडे व त्याच्या सोबत सुरज नरूले भैया गिरडे शहजाद कुरेशी व प्रितम पाटील हे उभे दिसले तेव्हा सोहन देवगडे यांनी म्हटले की, ‘‘तु माझ्या मुंलाला करणी केली आहे’’ असे सांगत आहे तेव्हा फिर्यादीने त्यांना म्हटले की, ‘‘मी करणी केली नाही, मला करणी करता येत नाही’’ तर ते सर्वजण फिर्यादीला शिवीगाळ करू लागले व सोहन नरूले व तुषार कुबडे यांनी फिर्यादीला ढकलढुकल करत असंताना सोहन देवगडे याने हाथबुक्कयाने मारहाण केली व सौ. लता देवगडे हीने फिर्यादीला चपलाने मारले व त्याच्या सोबत ‘‘हनुमान मंदीरात चल’’ असे सर्वजंनानी म्हटल्याने फिर्यादी त्यांच्या सोबत हनुमान मंदीरात गेलो तेव्हा सोहन देवगडे व त्याची पत्नी लता यांनी म्हटले की, माझा मुलगा मंथन याला ‘‘तु करणी केली तेव्हा पासुन त्याची तब्बेत बरोबर राहत नाही त्याला तु बरे कर नाहीतर तुला जिवाने मारून टाकीन’’ असे म्हणुन सोहन देवगडे, तुषार कुबड, प्रितम पाटील यांनी फिर्यादीला हातबुक्कयाने मारहाण केली तसेच शहजाद कुरेशी किशोर धोटे सुरज अरूण नेरूल यांनी शिवीगाळ करून सौ. लता हीने चप्पलाने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६ भादवि. सहकलम महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन उमरेड करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. भिवापुर** :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा जावराबोडी शिवार, नागपुर ते गडचिरोली राज्य महामार्ग क्र. ०९ येथे दिनांक ०८/११/२०२२ चे १९.३० वा. सुमारास यातील आरोपी नामे– चेतन सहादेव खरकाटे, वय २७ वर्ष, रा. गवराळ, ता. लाखांदुर, जि. भंडारा याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल क्र.एम.एच.–३६/ए.ई–५२२८ ने गवराळ गावावरून भिवापुर उमरेड नागपुर येथे भिवापुर मार्ग जात असता जावराबोडी शिवारात वाहनावरील ताबा सुटल्याने मोटार सायकल स्लिप झाल्याने स्वत: चे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरकारतर्फे किशोर ठाकुर, ब.नं. २४ पोलीस स्टेशन भिवापूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी, सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन भिवापूर करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**